# पुस्तिका - बारा

## अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत, तसेच, वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांचा तपशील.

**१२.** हया कार्यक्रमांतर्गत सहाय्यकारी योजनांची अंमलबजावणी हया कार्यालयातर्फे करण्यात येत नाही. मात्र, दि. २९ जून १९५६ रोजी स्थापना करण्यात आलेल्या महापौर निधि समितीच्या निधीमार्फत वादळ, पूर, दुष्काळ, भूकंप, घरे कोसळणे व आगी लागणे हयांसारख्या नैसर्गिक आपत्तींमधील आपद्ग्रस्तांना त्वरित आर्थिक मदत देण्यात येते. तसेच, हृदयशस्त्रक्रिया, मुत्रपिंडरोपण, अपोहन (डायलिसिस), कर्करोग आणि इतर मोठया शस्त्रक्रियांसाठीसुद्धा रुग्णांना हया निधीमधून आर्थिक मदत दिली जाते. सदर निधि अखिल भारतीय स्तरावर कार्यरत आहे.

महापौर निधि हा कायमस्वरुपी व स्वतंत्र निधि आहे. वर नमूद केलेल्या आजारांच्या कारणांकरिता कोणतीही व्यक्ती आर्थिक मदतीकरिता माननीय महापौर हयांजकडे अर्ज करु शकते. सदर अर्जाची छाननी हया खात्यामार्फत करण्यात येते. माननीय महापौर हयांना महापौर निधि समितीने बहाल केलेल्या अधिकारांतर्गत माननीय महापौर सदर सहाय्य मंजूर करतात.

महापौर निधि हा लोकांनी दिलेल्या देणगीद्वारा तयार झाला आहे. महानगरपालिकेचे त्यामध्ये कोणतेही योगदान नाही. कोणतीही व्यक्ती हया निधीस देणगी देऊ शकते. महापौर निधीला दिलेली देणगी ही आयकरमुक्त आहे. काही वेळा, महापौर निधि समिति, सदर निधीमध्ये वाढ होण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते.

रुग्णांना हृदयशस्त्रक्रिया, मूत्रपिंडरोपण, कर्करोग इत्यादींसारख्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी रुपये २५,०००/- इतके आर्थिक सहाय्य दिले जाते आणि अपोहनाकरिता (डायलिसिस) रुपये १५,०००/- (वर्षातून एकदा) इतक्या रकमेचे आर्थिक सहाय्य दिले जाते.